पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०२

**सभावृत्तांत**

**दिनांक - ०२/१२/२०२१** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **०२/१२/२०२१** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा. राजापुरे माधवी राजेंद्र - सभापती**
२. मा. पवार मनिषा प्रमोद
३. मा. बारसे प्रियांका प्रविण
४. मा. सारीका शिवाजी सस्ते
५. मा. शैलेश ऊर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
६. मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर
७. मा. संजय मल्हारराव वाबळे

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा. संदिप खोत उप आयुक्त, मा.रोहीणी शिंदे प्रशासन अधिकारी, मा.पराग मुंढे सहा.प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

**विषय-क्र.१)** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपळे गुरव व वैदुवस्ती प्राथमिकशाळांमधील विद्यार्थांसाठी प्रायोजिक तत्तावर मे. आर.एच.डी.हेल्थकेअर प्रा. लि.संस्थेमार्फत आरोग्य सेवा देणेबाबत.

विषय- **क्र.२)** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील इ.१ ली ते इ. ४ थी तील विद्यार्थांना सुंदर हस्ताक्षर करिता “मे.स्पार्कल क्लासेस” यांच्या मार्फत सुंदर माझे अक्षर हे पुस्तक थेट पद्धतीने खरेदी करणेबाबत

----------

अ) दिनांक १८/१०/२०२१ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १५)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १८/११/२०२१ रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ०१)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ०२ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०२/१२/२०२१ विभाग - शिक्षण
सुचक - मा.मनिषा पवार अनुमोदक - मा.सारीका सस्ते
संदर्भ - मा. मनिषा पवार व मा. सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व शाळा सुरु होण्याबाबत संकेत देण्यात आलेले आहेत. तथापि, कोविड-१९ च्या आजाराविषयी अजूनही विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये भीती कायम आहे.त्यामुळे पालकांना त्यांच्या पाल्यास शाळेत पाठविण्याबाबत भिती निर्माण झाली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात म्हणून मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थांना मोफत आरोग्य सेवा देण्यात यावी त्याच अनुषंगाने मे. आर.एच.डी.हेल्थकेअर प्रा. लि. संस्थेने पिंपरी चिंचवड महानगरपालिका शाळेंतील विद्यार्थांना आरोग्य सेवा पुरविण्याबाबतचा प्रस्ताव दिलेला असून प्रति विद्यार्थी र.रु. ३५००/- कळविले आहे.तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपळे गुरव व वैदुवस्ती प्राथमिक शाळांमधील एकूण १३०८ विद्यार्थांसाठी प्रायोजिक तत्तावावर मे. आर.एच.डी.हेल्थकेअर प्रा. लि. यांना आरोग्य सेवा पुरविण्याबाबत काम देण्यास मान्यता देणेस तसेच सदर शाळेंमधील विद्यार्थांना आरोग्य सेवा पुरविण्याकरिता र.रु. ४५,७८,०००/- चे येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यतेसाठी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

----------

ठराव क्रमांक - ०३ विषय क्रमांक - ०२
दिनांक - ०२/१२/२०२१ विभाग - शिक्षण
सुचक - मा.मनिषा पवार अनुमोदक - मा.सारीका सस्ते
संदर्भ - मा. मनिषा पवार व मा. सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व माध्यमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थामध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच

मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व माध्यमिक शाळेतील विद्यार्थीचे हस्ताक्षर सुंदर होणेकरिता “मे.स्पार्कल क्लासेस” यांच्यामार्फत सुंदर माझे अक्षर हे पुस्तक खरेदी करणेबाबत प्रस्ताव कार्यालयास सादर केलेला आहे. सदरच्या एका पुस्तकाची किमत र.रु. ९८/- आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील इ. १ ली ते इ. ४ थी तील एकूण १४५२७ विद्यार्थांना सुंदर हस्ताक्षर करिता “मे.स्पार्कल क्लासेस” यांच्यामार्फत सुंदर माझे अक्षर हे पुस्तक थेट पद्धतीने खरेदी करण्यास व र.रु. ९,९५,९७४/- चे येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यतेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला**

--------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( राजापुरे माधवी राजेंद्र )
**सभापती**
मा.शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५४५/२०२१
दि. ०३/१२/२०२१



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.